Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# चंद्रपूर शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील सफाई कामगारांची सामाजिक स्थिती

**पिपल मोरेश्वर खोब्रागडे[1] व डी. टी. गजभिये[2]**
[1]IHLR&SS, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणीज्य व विज्ञान महा. ब्रम्हपूरी
[2]अनिकेत समाजकार्य महा.वडसा.
*Corresponding Author :-Pipal98@gmail.com

Communicated : 18.01.2023 | Revision : 25.02.2023 Accepted : 25.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**

भारतीय समाज व्यवस्था मुळातच भेदभाव, विषमता, घृणाभाव, यावर आधारीत असल्याने स्वच्छतेचे काम पुर्वपार चालत आलेल्या परंपरेनूसार महार, मांग, मेहतर, भंगी, वाल्मीकी, लालबेगी या जातीवरच सोपविण्यात आले. चंद्रपूर शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुद्धा याच जातीचे लोक सफाईचे काम करतात. आरोग्यास व जीवीतास हानिकारक असूनही त्यांनी अमानविय व अमानुष अशा या कामाचा स्विकार केला आहे. कामाच्या ठिकाणी सुविधांचा अभाव, तुटपुंज्या सुविधा असुनही स्वत:चा जीव धोक्यात घालून चंद्रपूर शहराच्या स्वच्छतेसाठी, नागरिकांच्या चांगल्या आरोग्यासाठी सकाळपासून राबत असतात, म्हणुनच सफाई कामगार खऱ्या अर्थाने चंद्रपूर शहराचे आरोग्यदूत, स्वच्छतादूत आहेत. इतरांच्या आरोग्यासाठी राबणाऱ्या या वर्गाची सामाजिक व आर्थिकस्थिती मात्र फारसी चांगली नाही. सतत घाणीच्या ठिकाणी काम करावे लागत असल्याने असंख्य आजारांनी त्यांना ग्रासले आहे. सार्वजनीक जीवनात भेदभावपूर्ण व्यवहारास तोंड द्यावे लागते. सतत अस्वच्छ ठिकाणी काम करावे लागत असल्याने अनेक सफाई कामगार नशेच्या आहारी गेले आहेत. त्यातून व्यसन व कर्जबाजारीचे प्रमाण वाढले आहे. शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. या वर्गातील स्त्रीयांना आजही अनेक सामाजिक समस्यांना तोंड दयावे लागते आहे, अलीकडे सफाईकामगार आपल्या भविष्याविषयी जागृत होत आहेत. नव्या वाटा चोखाळण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याची गती मात्र अतिशय संथ आहे.

**बिजशब्द**:- सफाई, समाज, कामगार, समस्या, अस्पृश्य

**प्रस्तावना :-**

भारतीय सामाजिक संरचनेत सफाई कामगारवर्ग सर्वात खालच्या दर्जाचा मानला जातो. प्राचीनकाळापासून चालत आलेल्या जातीव्यवस्थेमूळे जी जात ज्या वर्णव्यवस्थेच्या गटात समाविष्ठ होती त्यानुसारच त्या जातीला आपले काम करावे लागत होते. याच वर्णव्यवस्थेतील 'अस्पृश्य' जाती या सर्वात खालचा घटक असून त्यांच्याकडून स्वच्छतेची कामे करवून घेतल्या जात होती. ते करीत असलेल्या कामावरून पुढे तीच त्यांची ओळख बनली. घाणकाम, स्वच्छतेचे काम याच वर्गाने केले पाहिजे असा दंडकच बनला. ही प्रथा आतासुध्दा चालु आहे. याच समाजातील लोक सफाईकामगार म्हणून काम करीत आहेत.

आता स्वच्छतेच्या कामाकडे विकासाच्या अनेक घटकांपैकी एक घटक म्हणून पाहिल्या जाते. त्यामुळेच शहराच्या ठिकाणी सफाईच्या कामाची जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थावर सोपविण्यात आली. स्वच्छतेचे काम करुन नागरिकांचे आरोग्य जपण्याचे काम करित आहेत. यात सफाईकामगारांची भूमिका सर्वात महत्वाची आहे.

**उद्दीष्टे :-**

1. सफाईकामगारांचा पुर्वइतिहास जाणून घेणे.
2. चंद्रपूर शहरातील स्थानिकस्वराज्यसंस्थेतील सफाईकामगारांची सामाजिक परिस्थिती समजून घेणे.
3. सफाईकामगारांच्या कामाच्या स्वरुपाचा अभ्यास करणे.

**गृहीतके :-**

1. सफाईकामगारांचे व्यसनाचे व कर्जाचे प्रमाण अधिक आहे.
2. सफाईकामगारांना त्यांच्या कामावरुन ओळखल्या जाते.
3. सफाईकामगारात आपल्या अधिकार व हक्काबाबत व्यापक जनजागृतीची गरज आहे.

**व्याख्या :**

साफसफाईचे काम करणाऱ्या व्यक्तिला सफाई कामगार म्हणतात. ही व्याख्या फारच मर्यादित स्वरुपाची वाटते. रस्ते स्वच्छ करणे, कचरा उचलून तो नष्ट करणे, तथा सर्वसामान्य व्यक्ती मैला उचलन्याचे काम करू शकत नाहीत असे काम करणाऱ्या व्यक्तींना सफाई कामगार म्हणतात अशी सर्वसमावेशक व व्यापक व्याख्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी तथा विकास महामंडळाने केली आहे.

**सफाई काम व कामगारांची उत्पत्ती :-**

सफाई काम व कामगारांच्या उत्पत्तीविषयी तज्ञांमध्ये वेगवेगळे मतप्रवाह आहेत. एक मतप्रवाह असा आहे की, आर्यांनी आपले वर्चस्व अबाधीत ठेवण्यासाठी वर्णव्यवस्था निर्माण करून अनार्यांमधीलच विशिष्ट अशा जातींना हिन व खालच्या दर्जाची कामे दिली. पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांनी नाईलाजास्तव सफाई कामाचा स्विकार केला. दुसऱ्या मतप्रवाहानूसार मुस्लिम राजवटीत सफाई कामगार वर्गाचा उदय झाला. तिसऱ्या मतप्रवाहानुसार समाजव्यवस्थेनी बहिष्कृत केलेले, गावाच्या वेशीवर असलेले लोक उपजीविकेचे साधन म्हणून हिनकाम करण्यास सुरुवात केली. वरील तिनही मतप्रवाहानुसार स्पष्ट होते की, रस्ते स्वच्छ करणे, कचरा काढणे आणि शौचालय, मुताऱ्या साफ करणे ही कामे त्यांना करावी लागत होती.

**सफाई कामगारांची सामाजिक स्थिती :-**

आधुनिक काळात शहरीकरण, झपाटयाने वाढणारी लोकसंख्या यातुन मोठया प्रमाणात अस्वच्छता निर्माण झाली. त्याचा नागरीकांच्या जिवीतावर प्रादुर्भाव होऊ लागल्याने शहरात सफाई चे काम हातात घेण्याची गरज निर्माण झाली. तेच हे काम अस्पृश्य व दलित वर्गातील लोकांवरच सोपविण्यात आले. एकंदरीत भारतात सफाईचे काम कोणत्या काळात सुरु झाले याचे स्पष्टप्रमाण मिळत नसले तरी ब्रिटीश राजवटीत स्थानिक स्वराज्यसंस्थामध्ये संघटीत सफाईच्या कामाला सुरुवात झाली.

हातानी स्वच्छतेचे काम करणाऱ्या सफाई कामगारांच्या कामाचे एकंदर स्वरूप बघीतल्यास कोणत्याही सुज्ञ माणसाच्या अंगावर शहारे येतात. दूरवरूनजरी दुर्गंधीचा वास आल्यास नाकातोंडावरती आपण हात ठेवतो. मात्र आपल्या परिसराच्या शहराच्या स्वच्छतेसाठी सफाई कामगारांना स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता घाणीत उतरून काम करावे लागते. परिसरातील अस्वच्छता, भरलेले गटार अथवा नाले, ड्रेनेज, सिवेजची पाईपलाईन दुरुस्त करण्याचे काम ते हातानी करीत असतात. या सफाई कामगार समुदायाचे सामान्यत: दोन भागात वर्गीकरण करण्यात येतात. एक शौचालय साफ करणारे आणि झाडू मारणारे. यात मेहतर, भंगी, शेख भंगी, वाल्मीकी, मलकाना या जातींचा समावेश होतो. दुसऱ्या भागात झाडूनी स्वच्छतेचे काम करणाऱ्या महार, मांग, चांभार, डुमार, चांडाळ या जातीचा समावेश होतो. शारीरिक स्वच्छता, घरांची स्वच्छता, गुरांच्या गोठयाची स्वच्छता, रस्ते तथा सार्वजनीक ठिकाणांची स्वच्छता, मृतपशू गावाबाहे रफेकने असे सहा प्रकार सफाई कामाचे आहेत.

चंद्रपूर शहरातील स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये महार, मांग, चांभार, मेहतर, भंगी, वाल्मीकी, शेखभंगी या वेगवेगळ्या जातीतील लोक सफाईकामगार म्हणून काम करतात. यापैकी महार, मांग, चांभार, चांडाळ हया परराज्यातून येऊन येथे स्थायीक झालेल्या आहेत. महार, मांग, चांभार हातात झाडू घेऊन स्वच्छतेचे काम करतात. तर मेहतर, भंगी, वाल्मीकी, शेखभंगी, मलकाना या जातीतील कामगार सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या स्वच्छ करण्याचे काम करतात. अलीकडे हिंदू, मुस्लिम, बौद्ध या धर्मातील लोकसुद्धा सफाईकामगार म्हणून काम करण्यास सुरुवात केली आहे.

चंद्रपूर शहरातील स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये तीन क्षेत्रीय कार्यालय, सहा स्वच्छता प्रभाग असून एकून सफाईकामगार

८१२ आहेत. यात ४७५ कामगार स्थायी आहेत. २५५ कामगार कंत्राटी पध्दतीने काम करतात. ८२ नाली स्वच्छ करणारे कामगार आहेत. या सफाईकामगारांच्या कामाच्या स्वरूपात अनेकवर्षापासून कोणतेही बदल झालेले नाहीत. एवढेच नव्हे तर त्यांनी वापरत असलेल्या कामाच्या साधनांमध्येही फारसे बदल झाले नाहीत. बदलत्या काळानुसार काही यंत्रे आली आहेत. तरीही बहुसंख्य सफाईकामगारांना पारंपारीक पद्धतीनेच काम करावे लागत आहे.

चंद्रपूर शहरातील स्थानिकस्वराज्य संस्थांमध्ये सफाईकामगार म्हणून कामकरणाऱ्या सर्व जाती आपापल्या समाजाची, जातीची वैशिष्टये जपतात. पुरुषांचा पोशाख अन्य नागरिकांप्रमाणे असला तरी स्त्रीया आपल्या समाजाची वैशिष्टये दर्शविणारे पोशाख वापरतात. आपल्या पुर्वजापासून चालत आलेले पारंपारीक काम हातातून जावू नये म्हणून या जातीतील शिक्षीत स्त्रिया सुध्दा सफाईक्षेत्रात मोठया प्रमाणात कामगार म्हणून काम करीत आहेत. त्यामुळे सफाईकामगार म्हणून स्त्रीयांची संख्या मोठया प्रमाणात आहे. बालवयात मुलींचे लग्न लावून देण्याची काही उदाहरणे आजही या वर्गात आढळतात. विवाहाची पाट प्रथा त्यांच्यात आढळते. सेप्टीक टँक, गड्डयाचे शौचालय, हातानी साफ करणाऱ्या कामगारांना सार्वजनिक जीवनात दुय्यम वागणूकीचा, भेदभावाच्या सामाजिक कलंकाचा सामना करावा लागतो आहे.

अस्पृश्यांमध्येही अस्पृश्य समजला जाणारा सफाईकामगार वर्ग ज्यात स्वच्छता कामगार, मानवी मलमुत्र उचलून नेणारे, स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता जनतेच्या आरोग्यासाठी सतत राबणाऱ्या या वर्गाला अनेक सामाजिक समस्यांचा सामना करावा लागतो आहे. हे सफाईकामगार बाहेरून आलेले नसून येथीलच विषमतापूर्ण समाजव्यवस्थेतूनच निर्माण झालेला आहे. सफाई कामगार स्थानिकस्वराज्यसंस्थेतील कर्मचाऱ्यांच्या उतरंडीत सर्वात तळाच्या स्थानी येत असल्याने त्यांना चांगली वागणूक मिळत नाही. चंद्रपूर शहराच्या व शहरातील नागरिकांच्या चांगल्या आरोग्यासाठी सतत राबणाऱ्या या सफाईकामगारांना चांगल्या सुविधा व सन्मानाची वागणूक देणे आवश्यक आहे, त्यांना केवळ सफाईकामगार न समजता ते चंद्रपूरशहराचे स्वच्छतादूत, आरोग्यदूत म्हणून त्यांच्याकडे बघणे गरजेचे आहे.

गलिच्छ आणि दुर्गंधीच्या ठिकाणातील असाह्य वातावरणात काम करावे लागत असल्याने बहुतांश सफाई कामगार हे मद्यपानाचा अवलंब करीत आहेत. मद्यपान करणे ही एक गरजच बनली आहे. शिक्षणाच्या बाबतीत फार मोठी अनास्था या वर्गात आहे. त्यामुळे त्यांची शैक्षणिक स्थिती फारशी समाधानकारक नाही. निरक्षर व अल्पशिक्षीत कामगारांचे प्रमाण जास्त आहे. या स्थितीत काही प्रमाणात आता सुधारणा दिसून येते. एक सफाई कामगार म्हणतो, 'आमच्या अडचणीमुळे आम्ही शिकू शकलो नाही. आता आम्हाला कळू लागले आहे की, आम्ही शिकलो तर इतर समाजातील लोकही आमच्याशी चांगले वागतील. म्हणून आम्ही मुलांना शिकविण्याचा निर्धार केला आहे.' यावरून असे दिसून येते की सफाई कामगारांना शिक्षणाचे महत्व कळू लागले आहे. शिक्षण हे जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे साधन आहे, हे त्यांना समजायला लागले आहे. परंतु आर्थिक अडचणींमुळे आपल्या मुलांना चांगल्या शाळेत किंवा इतर आधुनिक सोयीसुवीधा उपलब्ध करून देवू शकत नाही. त्यातच घरातील वडीलधारी माणसे सफाई कामाला जात असल्याने मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यास फारसा वेळ मिळत नाही. एकंदरीत सफाईकामगारांमध्ये चांगल्या शैक्षणिक वातावरणाचा अभाव दिसतो.

अलीकडच्या काही वर्षात अस्वच्छतेच्या, घाणीच्या प्रमाणात बरीच वाढ झालेली असल्याने त्या मानाने कामगारांची संख्या मात्र तेवढीच आहे. त्याचा परिणाम कामगाराच्या शारिरीक व

मानसिक आरोग्यावर होतो. सफाईकामगाराच्या दिवसाची सुरुवातच घाण व अस्वच्छ कामाने होत असल्यामुळे आजार त्यांच्याकडे येत नाही. तर सफाईकामगारच आजाराकडे जात असतात. घाणीच्या व दुर्गंधीच्या ठिकाणी सतत काम करावे लागत असल्याने अनेक कामगारांना त्वचा रोग, श्वसनाचे आजार झालेले आहेत. त्याचबरोबर, डेंगू, मलेरिया, पाठदुखी, गुडघेदुखी यासारख्या बिमाऱ्यांचे शिकार होतांना दिसतात. अनेक सफाई कामगारांनी आपल्या आरोग्याच्या अडचणी व्यक्त केल्या आहेत. एक सफाई कामगार कामाच्या ठिकाणी होणाऱ्या कुचंबनेविषयी बोलतांना म्हणतो, 'आम्हीसुध्दा इतरांप्रमाणेच हाडामासाची माणसे आहोत. आम्हालाही भावभावना आहेत. परंतु कामाच्या ठिकाणी आमच्या साठी बाथरुम, शौचालयाची व्यवस्था नाही, कपडे बदलविण्यासाठी जागा नाही, हात धुण्यासाठी साबन नाही, पाणी नाही, उघडयावर जेवण करावे लागते'.

**निष्कर्ष :-**

1. सफाई कामात ठराविक जातीचे, समुदायाचेच लोक काम करतांना दिसून येते.
2. सफाईच्या कामास आजसुध्दा हिनदर्जाचे काम म्हणून पाहिले जाते.
3. सफाई कामगारांमध्ये व्यसन व कर्जबाजारीपणाचे प्रमाण जास्त आहे.
4. सफाई कामगार वर्गांमध्ये शिक्षणाचे प्रमाण आजही कमी आहे.
5. कामाच्या ठिकाणी सफाई कामगारांसोबत नागरिक अंतर ठेवून वागतात.

**मूल्यमापन :**

प्रस्तूत शोधनिबंधात सफाईकामगारांची सामाजिक स्थिती पाहिल्यानंतर दिसून येते की आजही या व्यवसायात काम करणाऱ्यांना कामगार म्हणूनन पाहता घाण काम करणारे म्हणून पाहतात. चंद्रपूर शहराची सफाई करून नागरिकांचे आरोग्य जपणारे मात्र स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असतात. व्यसन व कर्जबाजारीपणाने त्यांना ग्रासले आहे. साक्षरतेचे प्रमाण अतीशय कमी आहे. धार्मीक प्रभाव अधिक असल्याने अंधश्रध्दा, देवभोळेपणा, नवस यावर त्यांची फार जास्त श्रध्दा आहे. परंपरेने सहज मिळणारा व्यवसाय म्हणून सफाई कामावर त्यांचा विश्वास आहे. परंतू आता बदलत्या काळानूसार सफाई कामगारात परिवर्तनाचे विचार रुजत आहे. आपल्या मुलांना शिकवून अन्य व्यवसाय, नोकरी शोधन्याचा प्रयत्न करू लागले आहेत.

**संदर्भ:**

मुलाखत – सफाईकामगार

खुदशाहसंजीव – सफाईकामगार समुदाय, सुगावा प्रकाशन पुणे, 2009

ठाकूर अरुण, खडस महमद – नरकसफाईची गोष्ट, सुगावा प्रकाशनपुणे, 2007

वाल्मीकी ओमप्रकाश – सफाईदेवता, राधाकृष्ण पेपर बुक्स प्रकाशन दिल्ली, 2009